
# निळुभाऊ फुले यांना दोन पत्रे

डॉ. यशवंत मनोहर



# निळूभाऊ फुले यांना दोन पत्रे

डॉ. यशवंत मनोहर

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

निळूभाऊ फुले यांना दोन पत्रे
डॉ. यशवंत मनोहर

प्रकाशक
नितीन धनराज हनवते
युगसाक्षी प्रकाशन
राहुल अपार्टमेंट, प्लॉट १७२ बी,
पहिला माळा, एफ ३, त्रिमूर्तीनगर,
रिंग रोड, नागपूर-४४००२२
मो. फोन : ९८५०३३९४२८

© प्रा. डॉ. पुष्पलता यशवंत मनोहर
'लुम्बिनी', ४५, लोकसेवानगर, नागपूर-४४००२२
फोन - (०७१२)२२३७६५६
मो. फोन : ९४२२१०२३९६

संगणकीय अक्षरजुळवणी आणि मुद्रणस्थळ
वैभव प्रिंटर्स, १७, कन्नमवार नगर,
वर्धा रोड, नागपूर-२५
फोन : २२९०४४५, ९८२२२०३४७४

मुखपृष्ठ : भाऊ दांदडे, नागपूर

मूल्य : रुपये १०/- फक्त

डॉ. यशवंत मनोहर
'लुम्बिनी', ४५, लोकसेवानगर, नागपूर-४४००२२ फोन : (०७१२) २२३७६५६ दूरभ्रमण : ९४२२१०२३९६

दिनांक : ३ फेब्रुवारी २००६

प्रति,

नटसम्राट निळूभाऊ फुले

यांसी, स. जयभीम

२९ जानेवारी २००६ चा 'लोकनायक'चा अंक वाचला. लोकनायकच्या पहिल्याच पानावर आपले छायाचित्र दिसले. 'निळू फुले यांना दैवी शक्तीचा साक्षात्कार!' हा मथळा पाहिला. माझ्या दुःखी उत्सुकतेने मथळ्याखालील मजकूर वाचला. त्यातील "...एकेकाळचा माझ्यासारखा नास्तिक आता आस्तिक होण्याच्या मार्गावर आला आहे. मी तरुण होतो तेव्हा देव नाकारत होतो पण आता मात्र देव ही काहीतरी शक्ती असावी असे वाटत राहते. कदाचित हे पराभूत मानसिकतेचं लक्षणही असू शकेल." ही वाक्ये वाचली, आरपार बेचैन झालो आणि आपण ज्यांच्या अजोड अभिनयावर आणि त्याहूनही ज्यांच्या उदंड माणुसकीवर अतोनात प्रेम करतो त्या निळूभाऊ फुल्यांशी यासंदर्भात जरा गंभीरपणे बोलावे असे मला मनापासून वाटले आणि तुम्हाला हे पत्र लिहायला घेतले.

नाशिकच्या मुरकुटे सार्वजनिक वाचनालयाच्या नवव्या वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या प्रकट मुलाखतीत आपण वरील मनोगत व्यक्त केले. हे आपले मनोगत वाचले आणि वाटले परिवर्तनाच्या लढाईतील 'निळूभाऊ' नावाचा आपला एक पराक्रमी आणि विश्वासू मोहरा अकारणच पराभूत झाला. ३१ जानेवारी २००६ च्या लोकनायकचा संपादकीय लेखही वाचला. 'हे वयच असं असतं!' असे या लेखाचे नाव आहे. या संपादकीय लेखामधून आपणासंबंधीचा अपार आदरच व्यक्त झाला आहे आणि आपण दैवशरण होऊ नये अशी उत्कट अपेक्षाही व्यक्त झाली आहे. निळूभाऊ, आपला वैचारिक प्रवास, आपल्या व्यक्तिमत्त्वाची बैठक आणि आपण आजवर पुरस्कारला तो बौद्धिक वारसा आम्हा सर्वांनाच माहीत आहे. परिवर्तनाच्या कुटुंबातील आम्ही सर्वच भावंडे आपणाकडे एक आधारवड म्हणून, निष्ठांचा एक अभेद्य महामेरू म्हणून पाहतो आहोत. पण आपणच ईश्वराला शरण गेलात तर तुमच्यावर प्रेम करणाऱ्या आम्हा सर्व नास्तिकांना काय वाटेल हो निळूभाऊ?

'लोकनायक'च्या संपादकांनी 'हे वयच असं असतं!' असे आपल्यावरच्या स्नेहामुळेच म्हटले असले तरी या वयात असे कोसळूनच गेले पाहिजे असा काही नियम नाही. या वयात बुद्ध ईश्वराकडे गेला नाही हे आपणाला माहीत आहेच.

आपल्या नास्तिक आयुष्याच्या शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर देवाकडे वा दैववादाकडे गेले नाहीत हेही आपणास माहीत आहे. असे खूप लोक आहेत ज्यांनी देव ही संकल्पना पूर्णतः नाकारूनच टाकली. तुमचे आणि माझे ज्येष्ठ मित्र नटसम्राट डॉ. श्रीराम लागू आहेत, त्यांना विचारा, त्यांनी देव मानायला प्रारंभ केला आहे काय? आणि ते आस्तिक व्हायला लागलेले आहेत काय? मला खात्री आहे की डॉ. लागू असा विघातक दिशेने कधीच प्रवास करणार नाहीत. त्यांच्यावर केवढे प्रचंड आघात झाले ते आपणास माहीत आहेच. पण त्यामुळे डॉ. लागू कुणा दैवापुढे वा देवापुढे हतबल होऊन बसले असे म्हणता येत नाही.

आपण नास्तिक होता याचा अर्थ आपण बुद्धिवादी होता. पण उतारवयात बुद्धिवाद असा थकत असेल आणि वाकत असेल तर तो बुद्धिवाद खरा बुद्धिवाद नसतोच निळूभाऊ! नास्तिक कोण तर ईश्वर, परलोक आणि वेद या गोष्टी जो मानीत नाही तो! या गोष्टी म्हणजे परत या सर्वच गोष्टींशी संबंधित सर्वच अंधश्रद्धांचा विराट पसारा मानीत नाही आणि विषमता मानीत नाही तो नास्तिक होय. आपण नास्तिक होता याचा अर्थ आपण वरील सर्वच गोष्टी मानीत नव्हता असा आहे. एक लक्षात घ्या, कालच्या खोट्या गोष्टी आज खऱ्या 'वाटणे' म्हणजे कालच्या खोट्या गोष्टी खऱ्या 'ठरणे' नव्हे तर या सर्व खोट्या गोष्टी भीतीपोटी प्रभावी ठरणे असते. पाच-पंचवीस वर्षांपूर्वीचे पितळ आज सोने ठरत नाही तसे पाच-पंचवीस वर्षांपूर्वीचे सोने नंतर पितळ ठरत नसते. पितळ हे पितळच राहते. सोने हे सोनेच राहते. पण तसे एखाद्या व्यक्तीला वाटतच असेल तर त्या व्यक्तिच्या डोळ्यांना भ्रम झालेला आहे आणि ती व्यक्ती त्या भ्रमालाच सत्य मानून बसली आहे असा त्याचा अर्थ आहे. गो.पु. देशपांड्यांनी उद्‌ध्वस्त धर्मशाळेच्या प्रास्ताविकात हे गरुड असे खाली का झेपावतात असे लिहिले आहे. निळू फुले हा आमचा माणूस या गरुडांसारखा खाली झेपावू नये असे आम्हाला मनापासून वाटले तर त्यात आमची काय चूक आहे हो निळूभाऊ? पण हे आमचे वाटणे तोंडघशी पडू नये असे तुम्हाला का वाटत नाही असा प्रश्न मला पडलेला आहे.

आस्तिकतेकडे जायला लागलेले तुम्ही आमच्या मनातील तुमच्यासंबंधीच्या आदरालाच आग लावीत आहात असे नाही तर ज्यांच्याविरुद्ध आमची लढाई सुरू आहे त्या आमच्या शत्रूंची ताकद तुम्ही वाढवीत आहात. एखाद्या सामान्य माणसाने देव मानल्यामुळे आस्तिकांचा विजय होत नसतो वा त्यांची ताकदही वाढत नसते पण निळूभाऊ फुल्यांसारख्या एखाद्या आमच्या म्होरक्याने देव मानायला प्रारंभ केला तर दैववाद्यांना परिवर्तनवाद्यांचा एक गड भुईसपाट केल्याचा आनंद होत असतो. आम्हा परिवर्तनवाद्यांना चिडविण्यासाठी दैववादी मंडळी अशी संधी पाहातच असतात. आम्हाला हसण्यासाठी ते अशा दाखल्यांची वाटच पाहात असतात.

आम्हाला हसण्यासाठी अशी उदाहरणे त्यांना पुराव्यांप्रमाणे उपयोगाची ठरत असतात. म्हणून म्हणतो आम्हाला वाकुल्या दाखविण्याची आणि आम्हाला हसण्याची संधी दैववाद्यांना नका देऊ!

निळूभाऊ, आपण पंचाहत्तर वर्षांचे झालात. आपण एक समृद्ध आयुष्य जगलात. तुमच्या नावामागे एक झगमगते वलय आहे. एक प्रतिभावंत अभिनेता तुमच्यात आहे. परिवर्तनाच्या चळवळींना आपण नाना पद्धतींनी मदत करता. एक सभ्य आणि सुसंस्कृत माणूस ही तुमची प्रतिमा महाराष्ट्रातील सर्वांनीच उराशी कवटाळून ठेवलेली आहे. कोट्यवधींच्या वाट्याला येत नाही असा कीर्तिचा आणि आदराचा महोत्सव तुमच्या आयुष्यात फुलला आहे. निळूभाऊ तुम्ही सामान्य नाहीत. जनसामान्यांशी सतत संबंध ठेवणारे तुम्ही असामान्य मनुष्यसम्राटही आहात आणि नटसम्राटही आहात. तुमच्या आयुष्यावर विजयाच्या एवढ्या पताका फडकत असताना पराभूतपणा तुमच्या मनापर्यंत येऊच कसा शकला असा प्रश्न मला पडलेला आहे. आणि तुमच्यासारखा कणखर मनाचा माणूस मृत्यूच्या जाणिवेने घाबरला असेल हेही मला पटण्यासारखे नाही.

हे जीवन आहे निळूभाऊ! कुठल्याही रेषेला एकच टोक नसते. कुठल्याही वाक्याला एकच टोक नसते. कुठल्याही काठीला एकच टोक नसते. आणि कुठल्याही प्रवासाला एकच टोक नसते. वरील प्रत्येकच गोष्टीला दोन टोके असतातच. प्रारंभ हे पहिले टोक असते. शेवट हे दुसरे टोक असते. हा संबंध 'कारण-कार्य' संबंधच आहे. दुसरे टोक का आहे? तर पहिले आहे म्हणून! शेवट का आहे तर प्रारंभ आहे म्हणून! मृत्यू का आहे तर जन्म आहे म्हणून! आपला बुद्धिवादच हे आपल्याला सतत पटवून देतो आहे निळूभाऊ! खूप माणसे इथे मरतच नसतात! कारण ही माणसे मुळात जगतच नसतात! आणि जी माणसे प्राण ओतून जगत असतात तीही माणसे मरतच नसतात. जगणारांना मरण असे टाळता येते. मरण असे उधाणून जगणारांच्या मार्गात कधीच येत नाही. हेही आपला बुद्धिवादच आपल्याला सांगतो. हे खरे असले तरी जो जन्माला आला त्याला देहावसान या अर्थाने मृत्यू अटळच आहे. जगात अब्जावधी माणसे जन्माला आली. मेली. तुम्हा-आम्हाला त्यातली बहुतांश माणसे आठवतच नाहीत. पण काही माणसे हजारो वर्षांपूर्वी मेली असली तरी तुमच्या आणि माझ्या मनात त्यांनी मांडलेली त्यांच्या कामांची मैफल थांबतच नाही. त्यातील अनेकांच्या विचारांच्या मैफलीचा कधी अंतच होत नाही. त्यामुळेच आपणावर निर्वातात गोठलेल्या अवस्थेत उभे राहण्याची पाळी येत नाही. आपण या अशा मानवी प्रज्ञांच्या आणि प्रतिभांच्या खांद्यावर बसून प्रवास करीत असतो. आपली पावले आणि आपली मने उजेडाच्या वाटा चालत असतात त्यामागे या प्रज्ञा-प्रतिभांचे हे चिरंजीव सोहळे उभे असतात. तेव्हा न जगणारांसाठी मरण हे वास्तव आहे आणि संपूर्ण ऊर्जेने जगणारांसाठी मरण हे अवास्तव आहे. म्हणून तुम्ही मरणाला घाबरत असाल अशी शंकाही मला येणे शक्य नाही.

देव, दैव मानतात वा आस्तिक असतात ते मरत नाहीत काय? मरतात. असे लोकही मरतात. त्यातले काही लहानपणीही मरतात. काही मोठेपणी मरतात. बरे वरील सर्व आस्तिक माणसांची मरणे ते आस्तिक आहेत म्हणून लांबणीवर पडतात काय? तर तसेही नाही. तीर्थयात्रेला गेलेली, हजला गेलेली, कुंभमेळ्याला गेलेली माणसे अपघाताने मरतात. तीर्थयात्रेला निघालेल्या बसेस उलटून माणसे मरतात. किलारीला गणपती विसर्जन करून आलेली माणसे भूकंपात मरतात. त्सुनामी लाटाही चर्चेसमधल्या, मंदिरामधल्या लोकांना समानच मानतात. देव न मानणाऱ्याला या लाटा मारतात आणि मानणाराला सुरक्षित ठेवतात असेही दिसत नाही. याप्रकारे देव-दैव मानल्याने मरण टळत नाही. ते लांबणीवरही पडत नाही. तेव्हा असे असेल तर निळूभाऊ नावाच्या आमच्या एका बुद्धिवाद्याने देव-दैववादी व्हायचे कशासाठी हा प्रश्न आहे.

आपण पंचाहत्तर वर्षांचे झालात. म्हणजे आता तुमचे मन छान परिपक्व झाले आहे. यावेळी तुम्हाला गरीब बुद्धिच्या माणसाप्रमाणे मरण दिसू नये. जीवन दिसावे. तुम्ही जगलात त्या जीवनातील सुंदर आठवणींची झुंबरे दिसावीत. संकटे, उपेक्षा, अवहेलना आणि उदासी या सर्व गोष्टींवर तुम्ही वेळावेळी कशी मात केली ते दिसावे. अशा सर्व आठवणींचे सुगंधी ताटवे तुमच्या नजरेच्या भोवती फुलावेत. माणसांच्या आयुष्यात दुःखे नसतात असे नाही. दुःखे असतातच. पण दुःखांपुढे आपण माथा टेकवला की दुःखे शिरजोर होतात. माणसे गरीब झाली की दुःखे गब्बर होतात. माणसे दुबळी झाली की दुःखे बलवान होतात. माणसे नरमली की दुःखे टणक होतात. आणि मग ती माणसांना दैवाकडे, देवाकडे घेऊन जातात. नियतीच्या शाळेत भरती करतात. जीवन निर्माण करू शकणाऱ्या माणसांना ही दुःखे मग मरण निर्माण करायला लावतात. दुःखे माणसांचे असे विसर्जन करतात.

काही माणसे दुःखामुळे दुबळी होत नाहीत. दुःखांपुढे वाकतही नाहीत. ही माणसे दुःखांना आपले विसर्जन करू देत नाहीत. ही माणसे दुःखांना वाकवतात. त्यांना सर्जनशील करतात आणि इथे दुःखांच्या भूमिकाच बदलून जातात. दुःखाचे आशय वेगळ्या वाटांनी धावू लागतात. दुःखे सर्व काही नष्ट करण्याचे काम करणारी पण आता ती खूप काही जन्माला घालणारी कामे करायला लागतात.

निळूभाऊ, तुम्हाला हे सगळे माहीत नाही असे नाही. हे सर्व तुम्हाला माहीत आहेच. इथे मी त्याची फक्त तुम्हाला आठवण करून देतो आहे असे समजा. अर्थात जे लोक पुनर्जन्म मानतात त्यांच्यासाठी मृत्यूचा अर्थ निराळा असतो. पण जे पुनर्जन्म मानीत नाहीत त्यांच्यासाठी मृत्यूला फार वेगळा अर्थ प्राप्त होतो. पुनर्जन्म मानणाऱ्या माणसांना मृत्यू येतो. पुनर्जन्म न मानणारी माणसे मृत्यूला सामोरी जातात. मृत्यू हे

त्यांच्यासाठी कुठल्याही पळवाटा नसणारे अटळ वास्तव असते. त्यामुळे अशी माणसे जगतानाही या महासत्याच्या उजेडातच जगत असतात. ते भ्रमात जगूच शकत नाहीत. कारण हे जगणेच त्यांच्यासाठी शेवटचे असते. अंतिम असते. एकमेव असते. त्यामुळे त्याची सुंदरताही मग असीम होऊन जाते. अशा व्यक्तींसाठी जीवनाचे मूल्य केवढेतरी वाढून जाते. अशा व्यक्ती मग याच जीवनावर आपले पूर्ण लक्ष केंद्रित करतात. कारण या जीवनाबाहेर अशा व्यक्तींसाठी कोणतेही जीवन अस्तित्वातच नसते.

अर्थात कुणी मानल्याने पुनर्जन्म खरा ठरत नाही आणि कोणाला हवा असतो म्हणून काही पुनर्जन्म अस्तित्वात येत नाही. ज्यांना अभ्यास करायचा नसतो ते विद्यार्थी उद्याला अभ्यास करू म्हणत म्हणत दरदिवशी अभ्यास पुढे ढकलत असतात. हे असे आळशांचे तत्त्वज्ञानच पुनर्जन्म मानण्याच्या मुळाशी असते. जे इथेच नीट जगत नसतात त्यांना पुनर्जन्म हवा असतो. हे पुस्तक न वाचणारांचे पाने पलटणे असते. इथे एक लक्षात घेतले पाहिजे ते हे की पुनर्जन्म मानण्याची प्रवृत्ती माणसाला या जन्मासंबंधी बेसावध करते. या जीवनाचे मूल्य कमी करते आणि मग परिणामी पुनर्जन्म तर नसतोच पण पुनर्जन्म मानणाऱ्या अशा व्यक्तीकडून याही जन्मावर आणि जीवनावर अन्याय होतो.

ईश्वर, पुनर्जन्म या काल्पनिक निवाऱ्याच्या जागा माणसाच्या मनातील भीतीने निर्माण केल्या आहेत. माणूस आदिम काळी पुराला घाबरला, वादळाला घाबरला. तो सर्पा-सिंहांना घाबरला आणि विशेषतः तो मृत्यूला घाबरला. अशा अनेक भीतींची बेरीज माणसाच्या दुबळ्या मनाने केली आणि त्याने त्यावर एक खोटा दिलासा देणारा उपाय शोधला. तो उपाय म्हणजे ईश्वर हा होय. नंतर त्याने पुनर्जन्माचा आणखी एक उपाय शोधून काढला. त्याने स्वर्ग हा आणखी नंतरचाही उपाय शोधून काढला. मृत्यूमुळे न डगमगता काही माणसांनी हेच जीवन मरणाला निर्भयपणे हसण्याइतके सुंदर आणि समर्थ करण्याचा प्रयत्न केला तर दुसऱ्यांनी मरणाला घाबरून या जीवनाकडे दुर्लक्ष केले आणि पुनर्जन्माची आणि स्वर्गाची फसवी स्पष्टीकरणे तयार केली. या दोन प्रकारच्या वृत्तींमध्ये फरक एवढाच आहे की एका वृत्तीच्या माणसांनी भूशाचे लाडू खाणे टाळले. दुसऱ्या वृत्तीच्या माणसांनी हे लाडू खाण्याशिवाय दुसरे काहीच केले नाही. या दोन वृत्तींमधली उपकारक, प्रामाणिक आणि अचूक वृत्ती कोणती वाटते निळूभाऊ आपणाला? माझे उत्तर तुम्हाला माहीत आहे. मला तुमचे उत्तर हवे आहे. मृत्यूच्या संदर्भातली एक छान कथा आहे. नव्वद वर्षांचा एक जर्मन म्हातारा जहाजावरील प्रवासात कठीण अशी चिनी लिपी शिकत होता. त्याच जहाजावर पंधरा ते वीस या वयोगटातील मुले मरणाच्या गोष्टी करीत होती. स्वर्गाबद्दल आणि नरकाबद्दल गंभीरपणे बोलत होती आणि नव्वदाव्या वर्षी चिनी लिपी शिकणाऱ्या म्हाताऱ्याला हसत होती. एका मुलाने म्हाताऱ्याला विचारलेच. 'आजोबा, तुम्ही या मरायच्या अवस्थेत ही चिनी लिपी कशाला

शिकता? तुम्हाला तिचा काय उपयोग होणार?' म्हातारा त्या मुलाला म्हणाला - 'अरे ही लिपी शिकण्यात मी इतका रंगून गेलो होतो की मला मरण येणार आहे हे मी विसरूनच गेलो होतो. पण तुम्ही तरुण मुलं मात्र सारखे मरणाबद्दल का बोलता? मरणाचा विचार का करता? तुम्हाला जगणे आवडत नाही काय? तुम्हाला जगण्यात जीव ओतणे जमत नाही काय?' मुलांना हा म्हातारा कळला असणे शक्य नाही, पण तो मला कळतो निळूभाऊ! तो मला कळतो आणि हा म्हातारा निळूभाऊ फुल्यांनाही कळतो हेही मला खात्रीपूर्वक वाटते. या दोन वृत्ती आहेत निळूभाऊ! आपण कोणत्या वृत्तीच्या रांगेत उभे राहायचे त्याचा निर्णय आपणच घ्यायचा असतो. आणि तुम्ही आणि मी त्या म्हाताऱ्याच्या तरुण रांगेत उभे राहले पाहिजे असे मला मनापासून वाटते. हे माझे उत्कट वाटणे तुमच्यावरील प्रेमातून उगवले आहे. माझ्यासारख्या अनेकांच्या प्रेमातून उगवले आहे. खोट्या गोष्टींसाठी आमचे खरे प्रेम तुम्ही झिडकारू नये असे मला वाटते. म्हणून हे पत्र तुम्हाला लिहिले आहे.

मी हैराण झालो ते यासाठी की तुम्हाला देव ही शक्ती असावी असे वाटते. लोक आम्हाला पाखंडी म्हणतात. हे लोक नरकात जाणार म्हणतात. म्हणू देत. पण चार्वाक, बुद्ध, मार्क्स, आंबेडकर हे ईश्वर, आत्मा नाकारणारे क्रांतीमानव पाखंडी होते का हो निळूभाऊ? खरे सांगणारे, लोकांच्या हिताचे सांगणारे लोक पाखंडी कसे असतील? लोकांना खोट्या गोष्टी सांगून फसवणारे, त्यांचे हजारो वर्षे शोषण करणारे सज्जन कसे किंवा तुमच्या एका सिनेमातील उच्चारानुसार 'म्वाड' कसे? आणि सत्य सांगणारे, लोकांच्या हितासाठी धुके जाळणारे कडू कसे आणि पाखंडी कसे हो निळूभाऊ! शोषकांच्या भाषिक व्यवस्थेने शब्दांच्या व्याख्या कशा चुकीच्या केल्या पहा! खऱ्याला खोटे ठरवले आणि खोट्याला खरे ठरवले. हजारो वर्षे हा उद्योग सुरू आहे. त्यामुळे लोकांचाही त्यावर विश्वास बसला आहे. सामान्य लोकांचा विश्वास या पाताळयंत्रीपणावर बसला पण निळूभाऊ फुले तुम्ही सामान्य नाहीत. बुद्धिवादाशी तुम्ही हात मिळवला आहे. विवेकवादाच्या सहवासात तुमच्या जीवनाचा मोठा काळ अत्यंत सुंदरपणे व्यतित झाला आहे. म्हणून तुम्ही या अंधश्रद्धांच्या गर्दीत शिरू नये असे मला मनापासून वाटते. हे पत्र मी तुम्हाला लिहायला घेण्याचे हे कारण आहे.

अंधश्रद्धा पुष्कळच आहेत पण सर्व अंधश्रद्धांच्या कुटुंबाची प्रमुख अंधश्रद्धा मात्र ईश्वर हीच आहे. महाअंधश्रद्धा म्हणा! आणि एक लक्षात घ्या निळूभाऊ, अंधश्रद्धा हे ईश्वर, धर्म, स्वर्ग, परलोक, पुनर्जन्म आणि विषमता या सर्व गोष्टी पोटात वागवणारे एक तत्त्वज्ञानच आहे. हे तत्त्वज्ञान शोषणाचे आहे. अंधश्रद्धा माणसाला खरे सांगत नाही. खोटे सांगते. अंधश्रद्धा माणसाला उजेडात नेत नाही, अंधारात नेते. अंधश्रद्धा माणसाला धुक्यात नेते. सत्याच्या मैदानात नेत नाही. या अंधश्रद्धेच्या तत्त्वज्ञानाने आपली माणसे हजारो वर्षे जाळली हो निळूभाऊ! आपल्या माणसांना या अंधश्रद्धांनी

हजारो वर्षे झोपवलेच. ही या तत्त्वज्ञानाने आपल्या माणसांची केलेली फसवणूकच होय असे नाही तुम्हाला वाटत? मला तसे वाटते म्हणून मी ईश्वर नाकारतो. पुनर्जन्म नाकारतो. धर्मही नाकारतो. इहवादाच्या रणभूमीवर ठामपणे उभा राहतो आणि भांडत जगतो.

निळूभाऊ, कुठे आहे हो ईश्वर? मराठी किंवा हिंदी सिनेमातील ईश्वर तुम्ही खरा मानता काय? पण आपणास एक सांगतो, मुळात ईश्वराची निर्मिती असे मराठी वा हिंदी सिनेमे निर्माण करणाऱ्या लोकांच्या मानसिकतेनेच केलेली आहे. अपघात आपल्याला माहीत आहेत. अरुण सरनाईक अपघातात गेले. भक्ती बर्वे अपघातात भीषण पद्धतीने गेली हे आपल्याला माहीत आहेच. यांच्या या अपघाती मृत्यूचे अपार दुःख मला झालेले आहे. पण अपघात का होतात? अपघात बेसावधपणामुळे होतात. चालकाला डुलकी आली की अपघात होतात. असेच आहे. बुद्धी बेसावध झाली की ईश्वर नावाचा अपघात जन्माला येतो. बुद्धिला डुलकी आली की पूर्वजन्म-पुनर्जन्म नावाचा अनेक पिढ्यांना नष्ट करणारा अपघात जन्माला येतो. पण खूपदा बौद्धिक बेसावधपणामुळेच या अशा गोष्टी जन्माला येतात असे नव्हे तर त्या बहुधा योजनाबद्ध पद्धतीनेही जन्माला येतात. हेही आपण जाणताच. ६ मार्च २००० रोजी डॉ. श्रीराम लागूंना मी एक पत्र लिहिले होते. ते पत्र माझ्या 'पत्रप्राजक्त' नावाच्या पत्रांच्या पुस्तकात प्रकाशित झाले आहे. त्यात मी ईश्वराच्या संदर्भात जे लिहिले होते ते मला आजही फार महत्त्वाचे वाटते. मी त्यात लिहिले होते - "रोडची कामे चालतात. या कामांवर आणि अशाच इतरही सरकारी कामांवर खूप नावे अशी नोंदविली जातात की त्या त्या नावाच्या व्यक्ती प्रत्यक्षात कुठेच अस्तित्वात नसतात. त्या व्यक्तींचे पगार निघतात. नियमितपणे त्यांची हजेरी दाखविली जाते. या अस्तित्वात नसलेल्या व्यक्तींच्या सह्या दुसराच कुणी करीत असतो आणि त्यांच्या नावाने निघणाऱ्या वेतनावर ताव मारीत असतो. हे भ्रष्टचाराचे मोठे संभावित रूप असते. हे खूप ठिकाणी, खूप संदर्भात सुरू असते.

डॉक्टर, मला वाटते ईश्वर या वरच्या उदाहरणातील अस्तित्वात नसलेल्या पण ज्याच्या नावाने पगार निघतो अशा हजेरीपटावर नावनोंदणी असलेल्या कामगाराचे प्रतीक आहे. कोणालातरी त्याच्या नावाने मिळणारे वेतन छान खायला मिळते. त्यामुळे अस्तित्वातच नसलेल्या ईश्वराचे नाव इथे असंख्यांच्या मानसपटावर कसे आले? मुळात हाच खोटेपणा इथे सत्य असल्याचा दावा केला गेला. त्यामुळे माणसांच्या मानसविश्वात फार मोठ्या पातळीवरील बिघाड झालेले आहेत. एका खोटेपणाने मानवी मनाचा खरेपणा मारला आणि तिथे खोटेपणाची प्रस्थापना केली. अस्तित्वात नसलेल्या कामगाराच्या नावे पगार उचलला जातो हा जसा माणुसकीचे वाटोळे करणारा एक मूलभूत भ्रष्टाचार आहे तसाच अस्तित्वात नसणारा ईश्वर अस्तित्वात आहे असे भासवून माणुसकीचा गळा घोटणारी ही योजनाही एक भीषणतम भ्रष्टचार आहे." असे आहे निळूभाऊ!

खरोखरच ईश्वर असता तर ईश्वर नाकारण्याचा मुद्दाच उपस्थित झाला नसता. तुम्हा आम्हा सर्वांना ईश्वराने निर्माण केले असते तर जगातल्या असंख्य माणसांमध्ये ईश्वर नाकारणारे मनही ईश्वरानेच कशाला जन्माला घातले असते? पण हे जाऊ द्या. दुनियेत आपली असंख्य सज्जन माणसे दुःखांच्या, शोषणाच्या वरवंट्याखाली भरडली जातात. भटके-विमुक्त, आदिवासी यांच्या वाट्याला भयंकर जगणे आणि अत्याचार येतात. स्त्रियांवर भीषण अत्याचार होतात. सज्जन माणसे आणि निरपराध माणसे नानाप्रकारे बळी दिली जातात. हे सर्व पाहून इथे ईश्वर आहे, या विश्वाची निर्मिती ईश्वराने केली यावर तुमचा विश्वासच कसा बसतो असा मला प्रश्न पडलेला आहे.

निळूभाऊ, मी ईश्वर नाकारतो ते बौद्धिक खाज खाजवून घेण्यासाठी अजिबात नाही. मी वास्तवात उभा आहे. मी इथल्या काही माणसांचे भयानक व्यवहार पाहतो आहे आणि काहींचे निर्घृण शोषण पाहतो आहे आणि ठामपणे सांगतो आहे "ईश्वर नाही. दैववाद नावाची कोणती गोष्ट नाही. नसलेल्या देवांच्या नावाने होणारे शोषण मात्र जरूर आहे."

निळूभाऊ, पत्र फार लांबले. पण या निमित्ताने तुमच्याशी बोलावे असे वाटले. म्हणून हे एवढे लिहिले. माझी तुम्हाला नम्र विनंती आहे. तुम्ही दैवाला आणि नियतीला अजिबात घाबरू नका. मी आहे ना!

मला आपण सांगा की दैवाला, नियतीला घाबरले असते आणि दैवाचे वा नियतीचे आदेश पाळले असते तर जोतीराव फुले एक महानायक होऊ शकले असते काय? दैवाने आणि नियतीने तर जोतीबा फुल्यांना आणि सावित्रीमाई फुल्यांना करायला सांगितले होते ते काम वेगळेच होते. दैवाने वा नियतीने नेमून दिलेली कामे करणारी माणसे कधीच बदलू शकत नाहीत. दैवाने वा नियतीने ठरवून दिलेली कामे करणारा समाज फक्त एकाच ठिकाणी थांबून राहू शकतो. त्याचा संबंध परिवर्तनाशी कधीही येऊ शकत नाही. भीमराव नावाच्या रामजीच्या पोराने नियतीचा वा दैवाचा हुकूम मानला असता तर आपल्याला डॉ. आंबेडकर मिळाले असते काय? निळूभाऊ फुले नावाचा माणूस नियतीचे वा दैवाचे ऐकून जगला असता तर नटसम्राट निळूभाऊ फुले होऊच शकला नसता. निळू फुले नियतीच्या आणि दैवाच्या भिंती तोडतात तेव्हा नटसम्राट होतात. मग 'आता' नियती वा दैव कशासाठी मानायचे असा प्रश्न आहे.

निळूभाऊ, दैव किंवा नियती हे समाजाला एका ठिकाणी सडवणारे सिद्धान्त आहेत. ते समाजातील विषमता पवित्र मानणारे आणि तिला मजबूत करणारे अमानुष सामाजिक सिद्धान्त आहेत. धर्म काय, ईश्वर काय किंवा कर्मविपाक काय या सर्वच गोष्टी समाजातील बदल नाकारण्यासाठी जन्माला घातलेल्या आहेत. याचा अर्थ हा की या सर्व गोष्टींचा स्वीकार करणे म्हणजे परिवर्तनाला, सामाजिक समतेला विरोध करणे! हे आपण करायचे काय? असा प्रश्न आहे.

निळूभाऊ मला एका प्रश्नाचे उत्तर आपण द्या. प्रश्न असा ! भारतातल्या वा जगातल्याही कोणत्या देवाने परिवर्तनाच्या चळवळी सुरू केल्या आणि चालवल्या आहेत काय? लोकांना माहीत असलेली देवांची सर्व प्रसिद्ध नावे तुम्ही डोळ्यांपुढे आणा. मी मुद्दामच इथे कोणा देवाचे नाव लिहित नाही. पण एका तरी देवाने परिवर्तनासाठी, समतेसाठी काही काम केले आहे काय? मला माहीत नाही. अजिबात माहीत नाही. तुम्हाला काही माहिती यासंदर्भात असली तर मला आपण जरूर सांगा.

आणि दैववाद आणि परिवर्तन यांच्यात मूलगामी अंतर्विरोध आहे की नाही? दैववाद म्हणजे काय तर परिवर्तनाच्या नावाने तयार करण्यात आलेला मृत्यूच होय. आणि नियती म्हणजे? नियती म्हणजे 'ठेविले अनंते तैसेची राहावे' हा आदेश! पूर्वजन्मीच्या पापपुण्यानुसार जे वाट्याला येईल तेवढेच करावे ही नियतीची टेक्नॉलॉजी आहे. कोणत्या जातीत जन्म घ्यायचा, कोणाच्या पोटी जन्म घ्यायचा, गावकुसाआत जन्म घ्यायचा की गावकुसाबाहेर जन्म घ्यायचा, गरिबीत जन्म घ्यायचा की श्रीमंतीत जन्म घ्यायचा, भिकारी म्हणून जन्म घ्यायचा की सांगकाम्या गुलाम म्हणून जन्म घ्यायचा या सर्वच गोष्टींचा निर्णय नियती घेत असते. तो तिचाच अधिकार आहे. कोणालाही त्यात बदल करता येत नाही. नियतीच्या लेखी जात तोडून संभवणारे व्यक्तीचे कोणतेही कर्तृत्वच संभवत नाही. तलावातले पाणी जसे तलावातच राहते तसे व्यक्तीला जातीत बंदिस्त केले जाते. व्यक्तीची विचारसंहिता वा आचारसंहिता म्हणजे त्या व्यक्तीच्या जातीचीच विचारसंहिता वा आचारसंहिता असते. म्हणजे नियतीने तयार केलेल्या समाजात वर्ण वा जाती असतात. व्यक्तींना तिथे अस्तित्वच नसते. या बंदिस्त रचनेत निळूभाऊंची कुठलीतरी जात असते. निळूभाऊ नावाची व्यक्ती तिथे संभवतच नाही. या बंदिस्त रचनेत यशवंत मनोहरांची कुठलीतरी जात असते. यशवंत मनोहर नावाची व्यक्ती निर्माण होण्याची कोणती शक्यताच या रचनेत नसते. कारण 'एक व्यक्ती - एक मूल्य' हे ध्येय असणारी ही रचनाच नसते. एक वर्ण-एक मूल्य वा एक जात एक मूल्य अशी ही रचना असते. आणि अर्थातच हे उतरंडीचे समाजशास्त्र असते. हे समाजशास्त्र धर्माने पवित्र ठरवलेले असते कारण या पावित्र्याशिवाय या समाजशास्त्राला लोकमान्यताच मिळत नाही. म्हणून स्थितीवाद हेच धर्माचे आडनाव असते. ते आपण लक्षात ठेवले पाहिजे.

आज जोतीबा फुल्यांचे नाव विद्यापीठांना दिले जाते. गाडगेबाबांचे नाव विद्यापीठाला दिले जाते. पंजाबराव देशमुखांचे नाव विद्यापीठाला दिले जाते. ज्या शिवाजी महाराजांना राज्याभिषेक नाकारला गेला होता त्यांचे नाव विद्यापीठाला दिले जाते. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठांना दिले जाते. ही क्रांती आहे. ही नवी संस्कृती आहे. हे नवे स्थित्यंतर आहे. हे सर्वसामान्य माणसांचे महानायक आता संस्कृतीचे महानायक ठरत आहेत. हा परिणाम देवांचे, दैवाचे

आणि नियतीचे आदेश पाळल्याचा आहे असे तुम्ही निश्चितच म्हणणार नाहीत.

निळूभाऊ, आपणासंबंधी आम्हा तुमच्या सर्वच चाहत्यांना अपार आदर आहे. आमचे एक परिवर्तनाचे घर आहे आणि त्यातला एक मोलाचा माणूस घराबाहेर पडू नये असे आम्हाला मनापासून वाटते. तुम्हाला कोणत्या देवाची वगैरे भीती वाटत असेल तर त्या देवाला माझ्याकडे पाठवा. माझा पत्ता तुम्हाला माहीत आहेच. पत्रावरही तो आहेच. माझा फोन आणि भ्रमण फोनही इथे लिहितो. ०७१२-२२३७६५६ हा माझा फोन आहे आणि ९४२२१०२३९६ हा माझा भ्रमणफोन आहे. तुम्हाला ज्या देवाची भीती वाटत असेल त्याला माझ्याकडे पाठवा तर! पण तो येईल काय? सूर्याच्या भेटीला अंधार जात नसतो. सूर्यापर्यंत जाता जाताच अंधार म्हणून तो नष्ट होऊन जात असतो. मी या सूर्याचाच मुलगा आहे म्हणून तो माझ्यापर्यंतही येणेच शक्य नाही. तरी सांगा! कोणत्याही देवाला सांगा आणि पाहा काय होतंय ते!

चिंता नका करू निळूभाऊ, मी आहे, डॉ. श्रीराम लागू आहेत, लक्ष्मण माने आहेत, पार्थ पोळके आहेत. असे खूप लोक आहेत. आपण घाबरू नका. आम्ही आहोत ना.

माझी तुम्हाला शेवटी नम्र विनंती ही की आ.ह. साळुंख्यांनी चार्वाकांना आस्तिक शिरोमणी म्हटले तरी आपण नास्तिक शिरोमणी चार्वाकांप्रमाणे नास्तिक शिरोमणीच असले पाहिजे. देव न मानणाऱ्या बुद्धाचे आपण निष्ठवंत पाईक असले पाहिजे आणि देव-दैव धुडकावून लावणारे आंबेडकरांचे दायादच आपण असले पाहिजे.

ईश्वर, दैव न मानणारांच्या आमच्या कुटुंबात तुम्ही मोठे झालात. आता मोठे झाल्यानंतर आस्तिकांच्या 'जाळत्या' घरात शिरू नका. माझे ऐका निळूभाऊ! मी तुम्हाला विनवितो आहे. मोठ्या कळकळीने तुम्हाला हे सर्व सांगतो आहे. तुम्ही आस्तिक झालात तर कोणाला यातना होतील न होतील पण मला भयानकच यातना होतील. म्हणून म्हणतो दुःखांच्या वणव्यातच मी जगतो आहे. आपण ती आग वाढवू नका. मलाही आणि माझ्यासारख्या आपल्या लाखो चाहत्यांना या अशा भयंकर यातनांमध्ये ढकलू नका. एवढीच नम्र विनंती.

प्रत्यक्ष भेट झाली तर आणखी खूप बोलता येईल. मी माझी सारी बौद्धिक शक्ती पणाला लावीन पण मी तुम्हाला आमच्या बुद्धिवादी घरातून बाहेर पडू देणार नाही. तुम्ही नागपुरास आला की या. बोलू. सुखदुःखाचे खूप बोलायचे आहे. दुःखे वाटून घ्यायची आहे. या. कधी येता? कळवा.

कळावे.

आपला,<br>
यशवंत मनोहर

दिनांक : २९ डिसेंबर २००५

प्रति,

प्रिय नटसम्राट निळूभाऊ फुले

२९ नोव्हेंबरच्या दै. सम्राटच्या अंकात 'निळू फुले यांनी नाकारली सरस्वती पूजा' या मथळ्याचे वृत्त वाचले. तुमच्या या सत्यशोधक कृत्याने तुमच्याबद्दलचा आदर शतगुणित झाला. फार आनंद वाटला. हा आनंद व्यक्त करावा आणि तुम्हाला धन्यवाद द्यावेत असे मनापासून वाटले. त्यासाठी हे पत्र!

नाशिक जिल्हा अक्षरमानवच्या शाखेच्या उद्घाटनासाठी निफाड तालुक्यातील शिरवाडेवणी आणि वडनेर भैरव येथे तुम्ही आला होता. यावेळी तुम्ही परंपरावाद्यांना दोन जबरदस्त धक्के दिले. काळूबाबा आश्रमाला भेट नाकारली हा एक धक्का आणि सरस्वतीच्या फोटोची पूजा नाकारली हा दुसरा धक्का! या दोन्ही धक्क्यांबद्दल तुम्हाला मी मनापासून धन्यवाद देतो. यावेळी असेही वाटले की असे धन्यवाद महाराष्ट्रातल्या मंत्र्यांना आणि नेत्यांना देता आले असते तर किती बरे झाले असते? पण ही सुसंधी या महाराष्ट्रातले हे लोक आपल्याला कधीही देऊ शकणार नाहीत. आणि याला कारण आहे त्यांचे मानसिक अपंगत्व! आपल्या सर्वच मंत्र्यांसकट, नेत्यांसकट शिक्षणक्षेत्रातील सर्वच मान्यवरांचे मानसशास्त्र बालमानसशास्त्रच आहे. यातले कोणीच सरस्वतीपूजन नाकारीत नाहीत. उलट अत्यंत भक्तीभावाने हे सर्वच लोक पूजा करतात.

मला वाटते राज्यातील शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीच्या निमित्ताने मुरली मनोहर जोशी केंद्रात मंत्री असताना सरस्वतीचा मुद्दा चर्चेला आला होता. अनेक शिक्षणमंत्र्यांनी सरस्वतीपूजनाला विरोध केला होता. हा प्रश्न देशभर गाजला. पण यानिमित्ताने या प्रश्नाची सखोल चर्चा करणे आणि त्यासंबंधी निर्णय घेणे आपल्या देशाला जमले नाही. शिवाय तिकडे एवढे तरी घडले. महाराष्ट्रसारख्या वैचारिकदृष्ट्या पुढारलेल्या राज्यात तर एवढेही घडले नाही. एकाही मंत्र्याच्या वा नेत्याच्या नावावर असा एखादा वैचारिक पराक्रम नाही.

आपले प्रबोधन अजून पांगुळगाडा सोडू शकत नाही. ते सारखे अंधश्रद्धांचा आणि प्रतिगामित्वाचा हात धरूनच चालते. कारण आपल्या या लोकांचे परिवर्तनासंबंधीचे बोलणे खोटे असते. वरवरचे असते. ही मंडळी मुळाला हातच घालीत नाहीत आणि तशी कृतीही करू धजत नाहीत. मतांसाठी ही राजकीय माणसे प्रवाहपतीत लोकांच्या अंधश्रद्धांना दुखवित नाहीत. लोकांच्या पारंपरिक भावनांना गोंजारित राहतात.

राजकारणातील लोकांनी अशा अंधश्रद्धांच्या विरोधात उभे राहावे. सरस्वतीपूजनासारख्या अशा असंख्य अंधश्रद्धा आपण का नाकारतो हे लोकांना शांतपणे समजावून सांगावे. असे झाले तर लोक अशा अंधश्रद्धांमधून बाहेर येतील. पण राजकारणाच्या क्षेत्रातील लोक असे कधीच करीत नाहीत. या अर्थाने आपल्या परिवर्तनाच्या आणि प्रबोधनाच्या वाटचालीतील एका शक्तीशाली अडसराचे काम हे राजकारणी करताहेत हीच गोष्ट आपल्या लक्षात येते.

नाना स्वामींच्या, बाबा-बुवांच्या आणि नाना मंदिरांच्या नादात हरवलेले हे लोक सरस्वतीपूजनासारखी गोष्ट नाकारतील अशी अपेक्षाच करणे चुकीचे आहे. याचाही अर्थ असा की आपले हे नेते फुले-आंबेडकरांचे नावही घेतात आणि फुले-आंबेडकरांचे परिवर्तनही दुबळे करण्याचे कार्य करतात. ही संविधानातील विज्ञानदृष्टीची आणि परिवर्तनवादाची शुद्ध फसवणूक आहे आणि फुले-आंबेडकरांचे नाव घेत हे करणे म्हणजे फुले-आंबेडकरांचीही ही फसवणूक आहे. लोकांचीही ही फसवणूक आहे. खरे म्हणजे परिवर्तन वगैरे गोष्टींशी या लोकांचे काहीच नाते नसते. या सर्वांचीच वैचारिक चारित्र्ये बघितली तर परिवर्तनाच्या मूल्यांशी, बुद्धिवादी आणि मूलभूत समतामूल्यांशी या लोकांचे काहीही देणेघेणे नसते. यांना फक्त सत्तेचा, तिच्या वैभवाचा उपभोग घ्यायचा असतो. लोकमानस बदलण्याशी आपला कोणताही संबंध येणार नाही याचीच काळजी जणू ही माणसे घेत असतात. परिवर्तनवाद्यांची लढाई या सर्वांशीच आहे.

मधल्या काळात जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु माळी यांच्या निमित्तानेही हा प्रश्न पुढे आला होता. नोकरी गेली तरी बेहत्तर पण सरस्वतीचा पुतळा विद्यापीठाच्या आवारात बसवणारच असा बालहट्ट त्यांनी धरला होता. आंदोलन झाले. याचा अर्थ शिक्षणक्षेत्रातील या उच्चविद्याविभूषित लोकांना वैचारिक जीवनच नाही असा आहे. परिवर्तनाशी या कोणाचे नातेच नाही असे वाटावे अशी स्थिती आहे. हे बहुतांश शिक्षणकारणी आणि राजकारणी लोक परिवर्तनाचे प्रमुख मारेकरी आहेत. संविधानातील समाजवाद, बंधुता, विज्ञानदृष्टी या मार्गाने समाजाच्या मनाला नेतो तो नेता! या अर्थाचे नेते किती आहेत? म्हणून देश विकून खाणारे, स्वतःची अफाट श्रीमंती वाढवणारे राजकारणी इथे आहेत. पण नेते नाहीत असे म्हणावे लागते.

सरस्वतीचा आणि शिक्षणाचा काय संबंध आहे? सरस्वती किती शिकली होती? तिने कोणते लेखन केले? तिने एखादी शैक्षणिक भूमिका मांडली काय? तिने एखादा शैक्षणिक सिद्धान्त मांडला आहे काय? तिने कोणते शैक्षणिक कार्य केले? या प्रश्नांची उत्तरे सरस्वतीची पूजा करणारांनी दिली पाहिजेत. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत

सरस्वती होती तरी इथे शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया शिक्षणवंचित का होत्या? की या सर्व लोकांना शिक्षणवंचित ठेवण्याचे कार्य करण्यासाठीच सरस्वतीची योजना होती? आजचे सर्व भौतिक स्वरूपाचे शिक्षण इंग्रजी राजवटीपासून सुरू झाले. इंग्रजांमुळे सुरू झाले. हे शिक्षण त्यांनी तिकडे फार पूर्वीपासून सरस्वतीची पूजा न करता विकसित केले होते. हजारो वर्षे सरस्वतीची पूजा करणारांना सरस्वतीपूजन न करणाऱ्या इंग्रजांपासून ही शैक्षणिक भीक का घ्यावी लागली? इंग्रजांपूर्वीच हे सर्व शिक्षण सरस्वतीने इकडे का विकसित केले नाही? धर्माचे आदेश मोडून शूद्रातिशूद्रांना आणि स्त्रियांना ते उपलब्ध का करून दिले नाही? ९०-९५ टक्के लोक इथे शिक्षणवंचित आहेत. गुलाम आहेत. या सर्व बहुजनविरोधी शैक्षणिक कटात सामील असलेली सरस्वती ही विद्येची देवता कशी? किती टक्के लोकांच्या विद्येची देवता? मग या तीनचार टक्के लोकांची विद्येची देवता बाकी ९५ टक्के शिक्षणवंचितांनी आपली विद्येची देवता का मानावी? ज्यांचा शिक्षणाशी संबंधच नव्हता त्यांची विद्येची देवता असणेच कसे शक्य आहे? या ९५ टक्के लोकांचा विद्यारंभ सावित्रीमाई फुले हा आहे. म्हणून सावित्रीमाई ही आमची विद्यामाता आहे हे सर्वांनी सांगायला हवे. सर्वच शाळा-कॉलेजांमधून सरस्वतीची पूजा बंद करून सावित्रीमाई फुलेंच्या प्रतिमा लावण्याचे आणि तिच्यासंबंधीच कृतज्ञता व्यक्त करण्याचे कार्यक्रम दर आठवड्याला व्हायला हवेत. तसा आदेशच शासनाने काढावा.

सरस्वती ही विद्येची देवता आहे हे असत्य जे सांगते ते शिक्षण नव्हे. सत्य न सांगणारे शिक्षण शिक्षण म्हणवून घेण्याची लायकी गमावून बसत असते. म्हणून आपल्या शिक्षणक्षेत्राने, राजकारणाने आणि इतरही सर्वच क्षेत्रातील नेतृत्वाने यासंदर्भातील सत्याशी नाते जोडण्याचा प्रयत्न करायला हवा. तशी मोहिमच राबवायला हवी.

सरस्वतीपूजन आणि हारार्पण या गोष्टी मी नेहमीच टाळल्या. स्नेहसंमेलनांचे उद्घाटन करायला माणसे मला बोलावतात तेव्हा आधीच मी माझ्या या संदर्भातल्या अटी सांगतो. एकदा आपल्याच एका महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचा उद्घाटक म्हणून गेलो असताना मी सरस्वतीला हार घालावा असा उच्चारही सूत्रसंचालन करणाराने केला. मी माईक घेतला आणि स्वच्छपणे नकार दिला. ही किमान १५-२० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. परवा भिशी या उमरेडजवळच्या गावात मराठीच्या शिक्षकांचा राज्यस्तरीय मेळावा होता. मी अध्यक्ष होतो. त्यांना मी तसे स्पष्ट सांगितले. सरस्वतीऐवजी त्यांनी माझ्यामुळे सावित्रीमाईंचा फोटो ठेवला. परवा किर्लोस्करवाडीजवळील कुंडल येथे माझे जागतिकीकरणावर व्याख्यान होते. सूत्रसंचालन करणाराने मी सरस्वतीला पुष्पहार घालावा असा उल्लेखही केला. पण मी ते केले नाही. कार्यक्रमानंतर आपले कार्यकर्ते

म्हणाले, ''सर, आपण सरस्वतीला हार घातला नाही. आमचे लक्ष होते.'' असे अनेक प्रसंग सांगता येतील. काटोललाही मी सावित्रीमाईंचा फोटो ठेवायला लावला.

आपण सरस्वतीच्या फोटोला हार घातला नाही याचा मला अपार गौरव वाटला. आपण एक पत्रक काढू. पाचपंचवीस मान्यवरांच्या सह्या घेऊ आणि शासनाला ते पाठवू. त्याचा पाठपुरावा करू. सरस्वतीची पूजा शाळा-कॉलेजांमधून बंद व्हावी. सावित्रीमाईबद्दलच आपली शिक्षणमाता म्हणून कृतज्ञता व्यक्त केली जावी, असा आग्रह धरू. सावित्रीमाईसंबंधी एक वंदना मी लिहिली. ती सोबत पाठवीत आहे. अभिप्राय कळवावा. पत्राची वाट पाहतो.

कळावे.

आपला,
यशवंत मनोहर

## सावित्रीमाई फुले : वंदना...

- यशवंत मनोहर

तूच आमुची माय आणि तू पलिता आमुचा
संस्कृती तू काळजांची; तूच मांडव चांदण्याचा ॥धृ॥

मृत्यूच्या जबड्यातूनी तू काढिले या लेकरांना
आग आम्हा पाजणारा हातही तूच संगराचा ॥१॥

ही सुगंधाची फुले, तू झेललेल्या तुच्छतेची
पेटलेला बर्फ आम्ही, काफिला अमुचा विजांचा ॥२॥


तूच आम्हा शिकविली ही मुक्तीची बाराखडी
आम्ही समतेच्या मुखांनी राग गातो जिंदगीचा ॥३॥

तूच आमुचे पंख आणिक झेपही तूच आमुची
तूच विद्यारंभ आणिक सूर्यवंशही आमुचा ॥५॥

आसवांची माळ आई अर्पितो आम्ही तुला
थोर सूर्यत्वापुढे तव नम्र माथा आमुचा ॥६॥

तूच आमुची प्राणहिता; तूच महानायिका
घेई मुजरा क्रांतीमाते या तुझ्या क्रांतीकुळाचा ॥७॥

***



नटसम्राट निळूभाऊ फुले यांना डॉ. यशवंत मनोहरांनी वेगवेगळ्या संदर्भात दोन महत्त्वाची दीर्घ पत्रे लिहिली. ही पत्रे अनुक्रमे 'दै. सम्राट' आणि 'दै. लोकनायक'मधून प्रकाशित झाली. या पत्रांना ऐतिहासिक मूल्य आहे. निळूभाऊ फुले यांच्या व्यक्तित्वाची सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि त्यांचा नटसम्राट आणि एक सामाजिक कार्यकर्ते म्हणून आदरणीय लौकिक या गोष्टी लक्षात घेता डॉ. यशवंत मनोहरांनी या पत्रांमधून मांडलेली गंभीर चर्चा आपल्या एकूणच सांस्कृतिक जीवनाला अंतर्मुख करणारी ठरेल यात शंका नाही.

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर